नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 31/07/2020 (शुक्रवार)
(सकाळ)

---

## घरफोडी

पो.स्टे. खापरखेडा :– अंतर्गत 2 कि.मी अंतरावर मौजा वार्ड क्र. 2, जयभोले नगर, हसनुर कान्वेन्टच्या मागे ग्रामपंचायत चनकापुर येथे दिनांक 29/07/2020 चे 23.30 वा. ते दिनांक 30/07/2020 चे 03.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– दिपक बालेश्वर पांडे, वय 38 वर्ष, रा. वार्ड नं. 02, जयभोले नगर हसनुर कान्वेन्टच्या मागे ग्रामपंचायत चनकापुर यांचा घराचा मागील दाराचा अज्ञात आरोपीने ऑलड्राप उघडुन घरात प्रवेश केला. यानंतर आरोपीने फिर्यादींच्या वडीलांच्या रूम मध्ये असलेल्या लोखंडी कपाटातुन नगदी 1,000/–रू. व सोन्या–चांदीचे दागिणे असा एकुण कि. 44,242/–रू चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम 457, 380 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोहवा जळते 9673837007 हे करीत आहे.

## विनयभंग

1) पो.स्टे. मौदा :– दि. 28/07/2020 चे 08:00 वा. ते 08:15 वा. चे सुमारास 30 वर्षीय पिडीत/फिर्यादी हि शेतात पेरणी करीता बाया नेत असता नेहमीच्या पांदन रस्त्याने असता आरोपी नामे– देवचंद पांडुरंग बारई, रा. मौदा जि. पानमारा हा तिला रस्त्यात आडवा होवून काहीही न बोलता अर्वाच्या भाषेत शिवीगाळ करून पीडितेस शेतात जाण्यापासुन रोकण्याचा प्रयत्न करून तिच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला. पीडितेने मनाई केली असता आरोपीने तिला अश्लिल व जातीवाचक शिवीगाळ करून पुर्ण परिवाराला खैरलांजी प्रमाणे जिवे मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम 354, 294, 341, 506 भादंवि. सहकलम 3(1) आर, 3(1)एस अनुसुचित जाती/अनुसुचीत जमाती अत्याचार प्रतिबंधक अधि. 1989. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास उपविभागीय पोलिस अधिकारी श्री. पुज्जलवार हे करीत आहे.

2) पो.स्टे. नरखेड :— दि. 30/07/2020 चे 19:00 वा. ते 19:30 वा. चे सुमारास 21 वर्षीय पिडीत/फिर्यादी व तिची आई सार्वजनीक ठिकाणी नळाजवळ पाणी आनण्याकरीता गेले असता आरोपी नामे— विलास सदाराम इरपाची, रा. खंडाळा मुंदाफळे याने अश्लिल शिवीगाळ करून पीडितेच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग करून केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. नरखेड येथे आरोपीविरुध्द कलम 354, 294 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास उपविभागीय पोलिस नाईक राजेश हावरे 9923365622 हे करीत आहे.

## फसवणुक

पो.स्टे. उमरेड :— अंतर्गत 1 कि मी अंतरावर एसबीआय एटीएम, उमरेड येथे दिनांक 30/07/2020 चे 10.00 वा. 10.30 वा. सुमारास फिर्यादी नामे— गजानन धोंडबा सायरे, वय 61 वर्ष, रा. सालेशहरी, ता. भिवापुर हे एस.बी.आय एटीएम. उमरेड येथे पैसे काढण्याकरिता गेले असता फिर्यादीच्या मागे उभा असलेल्या अज्ञात आरोपीने बोलता बोलता हातचालाखीने फिर्यादीचे जवळचे एटीएम कार्ड बदलुन घेतले. फिर्यादी त्यानंतर तिथुन निघुन गेल्यावर अज्ञात आरोपीने फिर्यादीचा एटीएम कार्ड वापरून वेगवेगळे ठिकाणावरून एकुण 52,272/—रू. काढुन घेत फसवणुक केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपी विरुध्द कलम 420 भादवी कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोहवा तारूदत्त बोरसरे, पो. स्टे. उमरेड मो. नं. 9284428758 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर